क्र.मासंवि/रवका/न.क्र.९/ 34992
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३
दिनांक : २५/११/२०११

# परिपत्रक

विषय : महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचा-यांसाठी **सन २०१२** या कॅलेंडर वर्षासाठी सार्वजनिक सुट्टया.

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दिनांक २९.९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी **सन २०१२** या वर्षासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या **१९ सार्वजनिक सुट्टया** महावितरण कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांकरिता [कर्मचारी सेवा विनियमातील परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') मध्ये समाविष्ट केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी व प्रशासकीय कार्यालयांव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करणारे कर्मचारी, तसेच स.सा.आदेश क्र.१२२ (क) दि.२२.३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (ANNEXURE —'A') आणि त्यानंतरच्या दि.३.४.१९९० व दि.१८.८.१९९० च्या पुरकपत्रांमध्ये नमूद केलेल्या पदावर काम करणारे कर्मचारी वगळून], जाहीर करण्यास मंजुरी दिली आहे. सदर सार्वजनिक सुट्टया या राज्य शासनाने परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ (Negotiable Instruments Act 1981) खाली घोषित केलेल्या सार्वजनिक सुट्टया आहेत.

२. कर्मचारी सेवा विनियमाशी संलग्न असलेल्या परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') अंतर्गत मोडणा-या कर्मचा-यांचे कामाचे ठिकाण विचारात न घेता त्या कर्मचा-यांना तसेच कंपनीची प्रशासकीय कार्यालये वगळता विद्युत उपकेंद्र अथवा कार्यालये/कार्यस्थाने (वर्क साईटस्/घटक/आस्थापना) या ठिकाणी काम करणा-या तांत्रिक कर्मचा-यांना (ते कोणत्या परिशिष्टाखाली मोडतात हे विचारात न घेता) आणि सामान्य आदेश क्र.१२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (ANNEXURE —'A') व त्यासंबंधीची पूरकपत्रे दि.०३.०४.१९९० व दि.१८.०८.९० यामध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन अगर त्याबद्दलची पर्यायी सुट्टी जमेस धरुन फक्त **६ (सहा) भरपगारी सुट्टया** जाहीर करण्यास व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिली आहे. प्रभारी अधिका-यांची पूर्व मंजूरी घेऊन या कर्मचा-यांना वरील प्रमाणे ६ (सहा) सुट्टया उपभोगता येतील.

३. नाममात्र हजेरीपटावरील आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचा-यांना (नैमित्तिक कामगार वगळून) सन २०१२ यावर्षी प्रजासत्ताक दिन (दि.२६ जानेवारी) व स्वातंत्र्य दिन (दि.१५ ऑगस्ट) या दोन राष्ट्रीय सणांच्या दिवशी तसेच महाराष्ट्र दिन (दि.१ मे) या राजकीय सणाच्या दिवशी भरपगारी सुट्टया मंजूर करण्यात आल्या आहेत. या सुट्टीच्या दिवशी काम करणारे कर्मचारी बदली/पर्यायी सुट्टी मंजूर करुन घेण्यास पात्र राहतील.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

*(विजय भि. बागुल)* 24/11/11
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

सहपत्रे : सार्वजनिक सुट्टयांची सूची
(परिशिष्ट - 'अ')

*D:\O&M\Holiday-2012.doc*

# परिशिष्ट 'अ'

## सार्वजनिक सुट्टया - २०१२

### (अ)

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०१२ | गुरुवार |
| २. | महाशिवरात्री | २० फेब्रुवारी, २०१२ | सोमवार |
| ३. | होळी (२ रा दिवस) | ०८ मार्च २०१२ | गुरूवार |
| ४. | गुढी पाडवा | २३ मार्च, २०१२ | शुक्रवार |
| ५. | महावीर जयंती | ०५ एप्रिल २०१२ | गुरूवार |
| ६. | गुड फ्रायडे | ०६ एप्रिल २०१२ | शुक्रवार |
| ७. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०१२ | शनिवार |
| ८. | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०१२ | मंगळवार |
| ९. | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०१२ | बुधवार |
| १०. | पारसी नववर्ष दिन (शहेनशाही) | १८ ऑगस्ट, २०१२ | शनिवार |
| ११. | रमझान ईद (इद-उल-फितर) (शव्वल-१) | २० ऑगस्ट, २०१२ | सोमवार |
| १२. | गणेश चतुर्थी | १९ सप्टेंबर, २०१२ | बुधवार |
| १३. | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोबर, २०१२ | मंगळवार |
| १४. | दसरा | २४ ऑक्टोबर, २०१२ | बुधवार |
| १५. | बकरी ईद (इद-उलझुआ) | २६ ऑक्टोबर, २०१२ | शुक्रवार |
| १६. | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | १३ नोव्हेंबर, २०१२ | मंगळवार |
| १७. | दिवाळी (बलिप्रतिपदा) | १४ नोव्हेंबर, २०१२ | बुधवार |
| १८. | गुरूनानक जयंती | २८ नोव्हेंबर, २०१२ | बुधवार |
| १९. | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०१२ | मंगळवार |

### (ब)

खालील सण **रविवारी** म्हणजेच सुट्टीच्या दिवशी येत असल्यामुळे त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इद-ए-मिलाद | ०५ फेब्रुवारी, २०१२ | रविवार |
| २. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०१२ | रविवार |
| ३. | रामनवमी | ०१ एप्रिल, २०१२ | रविवार |
| ४. | बुद्ध पौर्णिमा | ०६ मे, २०१२ | रविवार |
| ५. | मोहरम | २५ नोव्हेंबर, २०१२ | रविवार |

### (क)

मुंबई शहर व मुंबई उपनगरातील कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता दरवर्षी देण्यात येणारी स्थानीक सुट्टी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अनंत चतुर्दशी | २९ सप्टेंबर, २०१२ | शनिवार |

*D:\O&M\Holiday-2012.doc*
*16/11/2011*